भ्रमणध्वनीमुळे पालक-मुलांमध्ये संवाद कमी

बाल महोत्सव उद्घाटनप्रसंगी आदिती तटकरे यांची खंत

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : मुलांना अभ्यासासह कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत प्रावीण्य मिळवता यावे, यासाठी विभागामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात येत असतात. त्यांच्यातील कलागुणांना संधी मिळण्यासाठी बाल महोत्सवासह इतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. आजच्या तंत्रज्ञानाच्या व भ्रमणध्वनीच्या अतिवापरामुळे पालक व मुलांमधील संवाद कमी झाला आहे, कमी झालेला हा संवाद वाढविण्यासाठी विभागाच्या वतीने स्पर्धा, महोत्सव अशा विविध माध्यमांतून प्रयत्न करण्यात येत आहे, असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

पंचवटीतील मीनाताई ठाकरे स्टेडियममध्ये तीन दिवसीय जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव २०२३-२४ चे उद्घाटन मंत्री तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या वेळी महिला व बाल विकास विभागाचे उपायुक्त चंद्रशेखर पगारे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील दुसाने, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील, बाल हक्क आयोगाच्या सदस्या सायली पालखेडकर, माजी आमदार जयंत जाधव आदी उपस्थित होते.

पंचवटीतील मीनाताई ठाकरे स्टेडियममध्ये चाचा नेहरू बाल महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे आणि इतर (छाया- यतीश भानू)

या वेळी तटकरे यांनी मुलांना लहानपणापासूनच अभ्यासासोबतच त्यांना आवड असणाऱ्या क्षेत्रात संधी उपलब्ध करून दिल्यास, त्यांचा मानसिक व शारीरिक विकास होण्यास मदत होते, असे सांगितले. बाल महोत्सवाच्या माध्यमातून आनंद घेताना मुलांना कोणतीही दुखापत होणार नाही याची दक्षता संबंधितांनी घ्यावी, अशी सूचनाही तटकरे यांनी केली. प्रारंभी प्रातिनिधिक स्वरूपात अनाथ प्रमाणपत्र व माझी कन्या भाग्यश्री योजनेंतर्गत मुदत ठेव प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. तसेच बेटी बचाव, बेटी पढाव दौडच्या टी-शर्ट, टोपीचे लोकार्पण करण्यात आले. हवेत फुगे सोडून चाचा नेहरू बाल महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

मनमाडमध्ये अपघातात मुलाचा मृत्यू

मनमाड : शहरातून जाणाऱ्या इंदूर -पुणे महामार्गावरील ललवाणी पेट्रोल पंपासमोर मालमोटारीने दुचाकीस्वाराला धडक दिल्याने १६ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला.

बुधवारी दुपारी हा अपघात झाला. शहरातील गौतमनगर मध्ये राहणारा जुबेर पठाण हा दुचाकीने कामावर निघाला होता. ललवाणी पेट्रोल पंपासमोर मालमोटारीची दुचाकीला धडक बसल्याने जुबेरच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची बातमी शहरात पसरताच येथील उपजिल्हा रुग्णालयात नातेवाईकांसह नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. अपघात प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संक्षिप्त

बेझेत वक्तृत्व स्पर्धा

नाशिक : त्र्यंबकेश्वर तालुक्यातील बेझे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त नाशिक येथील श्री आदियोगी फाउंडेशनतर्फे वक्तृत्व, चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. वक्तृत्व स्पर्धेत प्रथम- पवन चव्हाण,द्वितीय-कल्याणी चव्हाण, तृतीय - अस्मिता चव्हाण, उत्तेजनार्थ- शालिनी बदादे तसेच चित्रकला स्पर्धेत प्रथम - नकुंशा तायडे, व्दितीय- प्रेरणा खंडिझोड, तृतीय- राहुल, उत्तेजनार्थ- वैष्णवी चव्हाण यांनी यश मिळविले. विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत सदस्य बाळू तूपलोंढे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शरद चव्हाण, पंडित तूपलोंढे, गणेश चव्हाण, फाउंडेशनचे सचिव नितीन पाटील, बेझे शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानदेव सोनवणे आदी उपस्थित होते. कलाशिक्षक संदीप नागरे यांनी चित्रांचे तर, शरद जाधव यांनी वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण केले.

शहर पोलिसांतर्फे महिलांचा सत्कार

नाशिक : शहर पोलिसांच्या वतीने आयुक्तालयाच्या आवारात सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी, सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिलांना वेगवेगळ्या क्षेत्राची दारे खुली झाल्याचे सांगितले. प्रत्येक महिलेचे काम महत्वाचे आहे, हेच या माध्यमातून अधोरेखीत होते. महिला एकत्र आल्यास अनेक प्रश्नांवर काम होऊ शकते, असेही मित्तल यांनी नमूद केले. शाहिस्ता इनामदार यांनी, महिलांचा सत्कार म्हणजे एक पाऊल सावित्रीसाठीची सुरूवात असल्याचे नमूद केले. प्रिया कर्णिक यांनी, सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिलांना शिक्षणाची दारे खुली झाली असून आता महिला पुरूषांच्या बरोबरीने काम करत असल्याचे सांगितले.

फेब्रुवारीत आएटीइची परिषद

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे प्रा. राम ताकवले संशोधन केंद्र आणि शिक्षणशास्त्र विद्याशाखा तसेच इंडियन असोसिएशन ऑफ टीचर एज्युकेटर्स (आयएटीइ) यांच्या संयुक्त विद्यमाने आयएटीईची ५६ वी राष्ट्रीय परिषद यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात १० ते १२ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे.

परिषदेचा विषय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील महत्त्वपूर्ण संकल्पना, भारतीय ज्ञान प्रणाली: शिक्षक, शिकवणे आणि शिकणे असा आहे. परिषदेत भारतीय ज्ञान व्यवस्था या संकल्पनेवर भारतीय संस्कृती, भारतीय शिक्षणातील परंपरा, शिक्षकांनी करावयाची तयारी व भूमिका, भारतीय ज्ञान व्यवस्थेचे मूल्यमापन, उच्च शिक्षणात भारतीय ज्ञान व्यवस्थेचा समावेश, शाश्वत विकासासाठी भारतीय ज्ञान व्यवस्थे सारख्या महत्त्वपूर्ण संकल्पनांवर विविध अंगाने विचार करण्यात येणार आहे.

महिला महाविद्यालयात वाणिज्य सप्ताह

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : गोखले शिक्षण संस्थेच्या एस.एम.आर.के.बी.के.ए.के. महिला महाविद्यालयात आठ जानेवारीपासून वाणिज्य विभागातर्फे वाणिज्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात 'वाणिज्य आणि व्यवस्थापनः कल, आव्हान आणि संशोधन' विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे.

चर्चासत्राच्या व सप्ताहाच्या उद्घाटन समारंभाला प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. संस्थेच्या सचिव तथा खजिनदार डॉ. दीप्ती देशपांडे अध्यक्षस्थानी राहतील. चर्चासत्रात आय.टी. एनेबल्ड बिझनेस विषयावर एंटरप्राइज सोल्युशन विंजीत टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड नाशिकचे मकरंद सावरकर मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्राच्या समारोप समारंभात सनदी लेखापा महेंद्र चतुर्मुथा, इएसडीएसचे व्यवस्थापक पीयूष सोमाणी मार्गदर्शन करणार आहेत.

वाणिज्य सप्ताहात डॉ. ए. एम. शेख, ॲड. राधिका देशपांडे हे विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. सप्ताहाचा समारोप १३ जानेवारी रोजी संस्थेचे विभागीय सचिव प्राचार्य डॉ. राम कुलकर्णी यांच्या उपस्थितीत होणार आहे. विद्यार्थिनींसाठी निबंध स्पर्धा तसेच व्यवस्थापकीय खेळांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. नीलम बोकिल, उपप्राचार्य डॉ. नितीन सोनगीरकर यांनी दिली.

जिल्हा परिषदेचे सावित्रीबाई फुले शिक्षिका पुरस्कार जाहीर

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : जिल्हा परिषदेच्यावतीने महिला शिक्षिकांना देण्यात येणारे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार जाहीर झाले आहेत. यंदा या पुरस्कारासाठी जिल्हा परिषदेच्या विविध शाळेतील १५ शिक्षिकांची निवड करण्यात आली असून पुरस्कार वितरण सोहळा लवकरच आयोजित केला जाणार आहे.

या पुरस्कारासाठी गटस्तरावरन एकूण २६ प्रस्ताव आले होते. त्यांची गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून गट बदल करून पडताळणी करून गुणांकन करण्यात आले. शिक्षिकांचे वर्गस्तरीय कामकाज, विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, गुणवत्ता वाढ, सहशालेय उपक्रम आदींचे अवलोकन करण्यात आले. पुरस्कारासाठी आवश्यक किमान अटी आणि शर्ती तथा निकष पूर्ण केलेल्या शिक्षिकांची प्रत्येक गटातून एक याप्रमाणे एकूण १५ नावे अंतिम करण्यात आली. पुरस्कार्थीमध्ये बागलाण तालुक्यातील मीनाक्षी भामरे (अंबासन शाळा), चांदवड - सविता दातरे (बोराळे), देवळा - संगिता कापडणीस (वासोळपाडा), दिंडोरी - योगिता मोरे (म्हेळूस्के), इगतपुरी - मंगला शार्दुल (टिटोली), कळवण - जानकाबाई बागूल (कळवण मुलींची शाळा), मालेगाव - भारती जाधव (टाकळी), नाशिक - शितल पगार (मातोरी), नांदगाव - भारती सूर्यवंशी, (जातेगाव), निफाड - शितल बावणे (कोकणगाव) पेठ - मंदाकिनी शेलार (वांगणी), सिन्नर - रविता भोईर (कहांडळवाडी), सुरगाणा - गौरी गायवन (गाळपाडा) येवला - मनिषा वाकचौरे (आडवाट, जळगाव नेऊर) आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यातील सुरेखा साबळे (नांदुरकीपाडा) या शिक्षिकांचा समावेश आहे.

पुरस्कारासाठी १५ शिक्षिकांची निवड

जिल्हा परिषदेच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कारासाठी १५ शिक्षिकांची निवड करण्यात आली असून गटस्तरावरुन आलेल्या २६ प्रस्तावांमधून ही निवड करण्यात आली. शिक्षिकांनी विविध उपक्रमांमध्ये घेतलेला सहभाग, घेतलेले कार्यक्रम यांचा पुरस्कारासाठी विचार करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळ्याची तारीख अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही.

निवड झालेल्या सर्व पुरस्कारार्थी शिक्षिकांचे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी अभिनंदन केले. पुरस्कार वितरण सोहळा लवकरच आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती शिक्षणाधिकारी डॉ. नितीन बच्छाव यांनी दिली.

वेगवेगळ्या भागांतून चार दुचाकींची चोरी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : शहरातील दुचाकी चोरीची मालिका कायम असून वेगवेगळ्या भागांतून पुन्हा चार दुचाकी चोरीस गेल्या. यातील एक घटना औरंगाबाद रस्त्यावरील विजय लक्ष्मी लॉन्स येथे घडली. याबाबत पेठ रोड भागातील अंगद गुप्ता यांनी तक्रार दिली.

गुप्ता हे विवाह सोहळ्यानिमित्त विजयलक्ष्मी लॉन्स येथे गेले होते. वाहनतळात उभी केलेली त्यांची दुचाकी चोरट्यांनी लंपास केली. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरी घटना अशोक स्तंभ भागात घडली. याबाबत अश्लेषा शिंदे (ध्रुवनगर) यांनी तक्रार दिली. शिंदे यांनी अशोक स्तंभ परिसरातील ॲक्सिस बँकेच्या एटीएमजवळ उभी केलेली दुचाकी चोरण्यात आली. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिसरी घटना चेतनानगर भागात घडली. याबाबत ओंकार अपार्टमेंट येथील अक्षय भालेराव यांनी तक्रार दिली. इमारतीच्या वाहनतळात उभी केलेली त्यांची दुचाकी ३१ डिसेंबरच्या रात्री चोरट्यांनी लंपास केली. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौथी घटना नाशिक रोड येथील मुक्तिधाम परिसरात घडली. विहितगाव येथील सुनील कदम यांची मुक्तिधाम परिसरात उभी केलेली दुचाकी चोरट्यांनी पळवून नेली.

अल्पवयीन मुलीवर अत्याचार

अल्पवयीन मुलीशी मैत्री करून एकाने बळजबरीने अत्याचार केला. आदिनाथ शिंदे (२१) असे संशयित तरुणाचे नाव आहे. याबाबत पीडित मुलीच्या पालकांनी तक्रार दिली. शिंदे आणि पीडिता एकमेकांचे मित्र आहेत. मुलगी अनुसूचित जाती-जमाती संवर्गातील असून संशयिताने मुलीस आपल्या घरी नेत कोणी नसल्याची संधी साधून बळजबरीने अत्याचार केला. घरी येऊन मुलीने कुटुंबीयांना माहिती दिल्यावर पालकांनी पोलिसांत धाव घेतली.

बस प्रवासात सोन्याची पोत लंपास

नाशिक ते येवलादरम्यान बसने प्रवास करताना महिलेच्या पर्समधील सोन्याची पोत चोरट्यांनी लंपास केली. याबाबत शोभा गडाख (आकाशवाणी केंद्राजवळ, गंगापूर रोड) यांनी तक्रार दिली. गडाख या मंगळवारी कोटमगाव येथे गेल्या होत्या. बस प्रवासात संशयितांनी त्यांच्या पर्समध्ये ठेवलेली सुमारे २२ हजार रुपयांची सोन्याची पोत लांबवली. घरी आल्यानंतर ही बाब लक्षात आल्यावर त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यश, उत्कर्ष, सानिया, श्रावणी विजयी

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : यश अहिरे, उत्कर्ष परदेशी, श्रावणी मांदळे आणि सानिया शेख यांनी नाशिक जिल्हा कॅरम संघटनेच्या वतीने आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, विभागीय क्रीडा कार्यालय यांच्या सहकार्याने येथे आयोजित कनिष्ठ गट स्पर्धेत विविध वयोगटाचे विजेतेपद मिळविले.

पंचवटीतील विभागीय क्रीडा संकुलात ही स्पर्धा झाली. स्पर्धेत २१ वर्षे गटात जिल्हा कॅरम सेंटरचा खेळाडू यश अहिरेने अंकुर अहिरेचा अंतिम सामन्यात २५-१७,२५- १३ असा पराभव केला. या गटात मुलींमध्ये सानिया शेखने विजेतेपद मिळविले. १८ वर्षे गटात उत्कर्ष परदेशीने अंतिम लढतीत प्रणव रामजालीचा पराभव केला. मुलींमध्ये या गटात श्रावणी मांदळेने प्रथम तर, ऋतुजा पिंगळेने दुसरा क्रमांक मिळविला.

पंचवटीतील विभागीय क्रीडा संकुलातील जिल्हा कॅरम स्पर्धेत विविध वयोगटातील स्पर्धकांचा सहभाग

प्रारंभी स्पर्धेचे उदघाटन बास्केटबॉलचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक तथा आदिवासी क्रीडा प्रबोधिनीचे प्राचार्य राजेश क्षत्रिय यांच्या हस्ते झाले. यावेळी बलकवडे कुस्ती केंद्राच्या प्रशिक्षिका नीलिमा शिरसाठ, आनंद खरे, राष्ट्रीय खेळाडू भूषण भटाटे, नकुल चावरे आदी उपस्थित होते. यावेळी क्षत्रिय यांनी, कॅरम खेळाडूंनी मेहनत केल्यास त्यांना यश नक्कीच मिळणार, असे सांगितले. या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे १८ वर्षे गटात उत्कृष्ठ सहा मुले आणि सहा मुली यांची निवड करण्यात आली. २१ वर्षे गटात मुले आणि मुलींमध्ये दोन -दोन खेळाडूंची निवड करण्यात आली. हे सर्व खेळाडू रविवारी दादर येथे आयोजित ५७ व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेत नाशिक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

कै.हुकुमचंद बागमार
प्रेरणास्थान

श्री.वसंत गिते
खंबीर नेतृत्व

सर्व सभासद, खातेदार व हितचिंतक यांना नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा व सर्वांचे खूप खूप आभार.

शुभेच्छुक

अध्यक्ष
श्री.सोहनलाल भंडारी

उपाध्यक्ष
श्री.रंजन ठाकरे

जनसंपर्क संचालक
श्री.अशोक सोनजे

सर्व संचालक मंडळ व नामको बँक परिवार

दि नासिक मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक
स्थापना : 1959
नामको बँक (मल्टि-स्टेट शेड्युल्ड बँक) Namco Bank (Multi - State Scheduled Bank)

चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड
Chola Enter a better life
कॉर्पोरेट कार्यालय : चोला क्रेस्ट, सी-५४ व ५५, सुपर बी-४, थिरू वी का इंडस्ट्रियल इस्टेट, गिंडी, चेन्नई-६०० ०३२.
शाखेचा पत्ता : ३०२, ३०३ व ३०४, सह्याद्री बिजनेस पार्क इंक., तिसरा मजला, पार्क इंक., त्रिंबक रोड, मायको सर्कल, नाशिक-४२२ ००२.

ताबा सूचना
[नियम ८(१) अंतर्गत] (अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड**चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ मधील नियम ३सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद १३(१२) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत **दि. १३.०३.२०२३ रोजी (कर्ज खाते क्र. एक्स०एचईएनएसपी००००२०९५३२४) एक मागणी सूचना** निर्गमित केली ज्यात **कर्जदार: १. अभिषेक अजय याज्ञिक (अर्जदार),** रो हाऊस क्र. ०३, ओम रेसिडेन्सी, तांबोळी नगर, हिरावाडी, पंचवटी, नाशिक, महाराष्ट्र-४२२ ००३. **२. सीमा अजय याज्ञिक (सह-अर्जदार),** रो हाऊस क्र. ०३, ओम रेसिडेन्सी, तांबोळी नगर, हिरावाडी, पंचवटी, नाशिक, महाराष्ट्र-४२२ ००३. **३. मे. डिझायनर फर्निचर गॅलरी (सह-अर्जदार),** दुकान क्र. बी, प्लॉट क्र. ४, स. क्र. २२०/१, दीप दर्शन अपार्टमेन्ट, माऊली लॉन्सजवळ, अंबड, नाशिक, महाराष्ट्र-४२२ ०१० यांना सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत दि. ०४.०३.२०२३ रोजीनुसार **रु. २०,५६,७८३.९९ (रुपये वीस लक्ष छप्पन्न हजार सातशे त्र्याऐंशी आणि नव्याण्णव पैसे फक्त)**ची तीवरील व्याजासह परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार व सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायजेशन प्रकरण क्र. क्री.एम.ए. ११८१, २०२३ मध्ये माननीय मुख्य न्यायदंडाधिकारी नाशिक यांनी पारित केलेल्या दि. ०९.१०.२०२३ रोजीच्या आदेशानुसार मालमत्तेचा दि. ०२.०१.२०२४ रोजी **प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे.

याद्वारे कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सावधगिरीची सूचना देण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो **मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड**च्या दि. ०४.०३.२०२३ रोजीनुसार **रु. २०,५६,७८३.९९ (रुपये वीस लक्ष छप्पन्न हजार सातशे त्र्याऐंशी आणि नव्याण्णव पैसे फक्त)** आणि त्यावरील व्याजाच्या भाराधीन असेल.

अचल मालमत्तेचे वर्णन : सर्व्हे क्र. १७२, सदनिका क्र. ८+९+१०+११, क्षेत्रफळ सुमारे ७६७.७५ चौ.मी., त्यावरील रो हाऊस क्र. ०३, क्षेत्रफळ सुमारे ६०.०१ चौ.मी., चटई क्षेत्रफळ सुमारे ७८.०१ चौ.मी. बिल्ट-अप क्षेत्रफळ आणि पोर्चचे क्षेत्रफळ सुमारे ७.४३ चौ.मी., सोबत पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद करण्यात आलेल्या जमिनीमधील अविभाजित मालकी, ओम रेसिडेन्सी नावाची रो हाऊस स्कीम, महसूल गाव नाशिक, ता. व जि. नाशिक, नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत, नाशिक आणि **चतुःसीमा : पूर्वेस :** सर्व्हे क्र. १७३, **पश्चिमेस :** १० मी. कॉलनी रस्ता, **दक्षिणेस :** रो हाऊस क्र. ४, **उत्तरेस :** रो हाऊस क्र. २.

दिनांक : ०५.०१.२०२४
स्थान : नाशिक, महा
स्वा./- प्राधिकृत अधिकारी
मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड
kotak
नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी २७, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई-४०००५१. **कॉर्पोरेट आयडेन्टिटी नं.** : एल६५११०एमएच१९५५पीएलसी०३८१३७.
शाखा कार्यालय : अग्री बिझनेस ग्रुप, रिकव्हरी टीम, कमर्शियल बँकिंग, ४था मजला, झोन III, न्याती युनिट्री, पुणे-अहमदनगर रोड, येरवडा, पुणे-४११००६.

विक्री सूचना (ए/डी सह रजि. पोस्ट) (रुल ६(२)/८(६))

प्रति,
१. मेसर्स भूमिका एन्टरप्रायझेस (ऋणको) (मालक श्री. संजय बाबुलाल पटेल यांच्याद्वारा प्रतिनिधित्व केलेले) राहणार - बिल्डिंग प्लॉट नं. १बी, एस नं. ४६२/१, कोणार्कनगरजवळ, मुंबई आग्रा हायवे, मौजे आडगाव, ता. व जि. नाशिक-४२२००३. **२. श्रीमती हिना संजय पटेल (हमीदार)** - प्लॉट नं. ९, एस आर नं. १७३, भगवतीनगर, हिरावाडी, पंचवटी नाशिक, जि. नाशिक-४११००३. **३. श्री. पंकज बाबुलाल पटेल (सह-ऋणको)** - प्लॉट नं. ९, एस आर नं. १७३, भगवतीनगर, हिरावाडी, पंचवटी नाशिक, जि. नाशिक-४११००३. **४. श्री. संजय बाबुलाल पटेल (गहाणकार)** - प्लॉट नं. ९, एस आर नं. १७३, भगवतीनगर, हिरावाडी, पंचवटी नाशिक, जि. नाशिक-४११००३.
प्रिय महोदय/महोदया,
विषय : सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल्स ६(२) व ८(६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत जंगम / स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.
ज्याअर्थी, प्राधिकृत अधिकारींनी सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या सेक्शन १३(४) नुसार (यापुढे "ॲक्ट' म्हणून संदर्भित) ३१.१०.२०२३ रोजी याखाली नमूद केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला होता, ज्याकरिता तुम्हास सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचनेमध्ये समाविष्ट केल्यानुसार १० ऑगस्ट, २०२१ रोजीप्रमाणे देय टर्म लोन अका. नं. **१९१३एफएल०१०००००००१, १९१३एफएल०१०००००००२ व सीसीओडी** अका. नं. **०६१२२६५९०३** च्या अनुसार रु. २,८२,०७,२४५.४४ (रुपये दोन कोटी ब्याऐंशी लाख सात हजार दोनशे पंचेचाळीस व पैसे चव्वेचाळीस फक्त) रक्कम असलेल्या तुमच्या/ऋणकोच्या दायित्वांच्या अनुसार सुरक्षा म्हणून देण्यात आली आहे.
ज्याअर्थी, तुम्ही ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत सूचनेच्या स्वीकृतीनंतरसुद्धा बँकेला तुमच्या/ऋणकोच्या दायित्वांच्या अनुसार परतफेड करण्यास असमर्थ ठरला आहात. त्यामुळे बँकेने ॲक्ट व रुल्सअंतर्गत मंजूर केलेल्या तिच्या हक्कांच्या निष्पादनात, या सूचनेच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत ३०.१२.२०२३ च्या प्रभावापासून रकमेवरील पुढील व्याज, किंमत, आकार व खर्च यासह २९ डिसें. २०२३ रोजीप्रमाणे देय टर्म लोन अका. नं. **१९१३एफएल०१०००००००१, १९१३एफएल०१०००००००२ व** सीसीओडी अका. नं. **०६१२२६५९०३** च्या अनुसार रु. ६,५४,८४,६०६.४९/- (रुपये सहा कोटी चोपन्न लाख चौऱ्याऐंशी हजार सहाशे सहा व पैसे एकोणपन्नास फक्त) या संपूर्ण दायित्वांच्या विमोचनाकरिता तुम्हास फर्माविणारी, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ६(२) (जंगम) व रुल ८(६) (स्थावर) या अंतर्गत ही सूचना निर्गमित केली आहे, त्यास असमर्थ ठरल्यास, बँक "जसे आहे जेथे आहे" व "जसे आहे जे काही आहे" आणि " जे काही आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" या तत्त्वावर आणि व्याज व किंमत यासह वर नमूद केलेली थकीत रक्कम वसूल करण्याकरिता कोणत्याही तक्रारीशिवाय सुरक्षित मालमत्तेच्या ई-लिलावाद्वारा विक्रीसह ॲक्टअंतर्गत प्रक्रिया सुरू करील.

विक्रीचा तपशील

लिलावाची तारीख व वेळ	**२४.०१.२०२४ रोजी स. ११:०० ते दु. १२:००**
मालमत्तेच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेकरिता राखीव किंमत	रु. २,९५,००,०००/- (रुपये दोन कोटी पंचाण्णव लाख फक्त)
मालमत्तेची इसारा रक्कम ठेव	रु. २९,५०,०००/- (रुपये एकोणतीस लाख पन्नास हजार फक्त)
वजात करावयाची टीडीएस	लिलाव विक्रीच्या १%
लिलावाचे स्थळ	https://kotakbank.auctiontiger.net या वेबसाइटवर तरतूद केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारा तसेच ऑक्शन टायगर मोबाइल ॲपमार्फत

टीडीएस वजात करण्याकरिता शर्ती
* टीडीएस वजात करण्यात येणार आहे आणि गहाणकाराच्या नावे जमा करण्यात येईल.
* जर गहाणवट मालमत्ता संयुक्तरीत्या मालकीची आहे, तर टीडीएस पहिल्या मालकाच्या नावे कळविण्यात येईल, जोपर्यंत तेथे विक्री विलेखामध्ये मालकीसंबंधित विशिष्ट गुणोत्तर आहे, अशा बाबतीत टीडीएस त्यांच्या मालकी गुणोत्तराच्या प्रमाणशीर वजात केला जाईल.
* लिलाव खरीददार, टीडीएस जमा केल्यानंतर, टीडीएस प्रदान निश्चितीकरणाचा पुरावा म्हणून फॉर्म नं. १६ए सादर करील.

आयटम नं.	विक्रीकरिता ठेवण्यात आलेल्या मालमत्तेचे वर्णन
(१)	पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- प्लॉट नं. १बी एरिया मोजमापाचा ६९१.३५ चौ.मी. व त्यावरील बांधकाम (सदर एरियापैकी एरिया मोजमापाचा २००.०० चौ.मी. नॅशनल हायवे डिपार्टमेंटद्वारा प्राप्त केला आहे) गॅट नं. ४६२/१चा, मालमत्ता येथे स्थित- मौजे-आडगाव, ता. नाशिक, जि. नाशिक, सदर मालमत्ता पुढीलप्रमाणे सीमित आहे- पूर्व : कॉलनी रोड; पश्चिम : प्लॉट नं. १ए, दक्षिण : प्लॉट नं. ३० व ३१, उत्तर : मुंबई आग्रा महामार्ग, त्यावरील सर्व विद्यमान बिल्डिंग्ज व स्ट्रक्चर्स आणि संबंधित गहाणवटीच्या तारखेपासून/नंतर कोणत्याही वेळेत त्यावरील उभारावयाचे/बांधकाम करावयाचे असल्यानुसार आणि त्यावर सर्व जोडून असलेले आणि सर्व फिक्चर्स व फर्निचर्स तसेच भूमीला जोडून असलेली संयंत्रे व यंत्रसामग्री किंवा सद्य किंवा भावी कालावधीतील, भूमीला कायमरीत्या जोडून असलेली / स्थिर असलेली कोणतीही वस्तू यासह एकत्रित.

ई-लिलावाद्वारा स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या शर्ती व अटी :-
वजात करावयाची टीडीएस : लिलाव किमतीच्या १%
ई-लिलावाद्वारा जंगम/स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या शर्ती व अटी :-
(१) ई-लिलावाचे आयोजन **"जसे आहे जेथे आहे" व "जसे आहे जे काही आहे", " जे काही आहे तेथे आहे"** आणि "कोणतीही तक्रार नाही" या तत्त्वावर करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार तेथे मालमत्तेवर कोणतेही भार नाहीत. तथापि, स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी लिलावावर ठेवण्यात आलेल्या मालमत्तेचा भार, नामाधिकार तसेच मालमत्तेस प्रभावी ठरणारे दावे/ हक्क/ देणी यासंबंधित त्यांनी स्वतः स्वतंत्र चौकशी करावी. प्राधिकृत अधिकारी/सुरक्षित धनको क